# महाराष्ट्र शासन

क्र. मपवि २०१८ /प्र.क्र. २६ / म्हापसू
कृषि, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास
व मत्स्य व्यवसाय विभाग,
मंत्रालय, मुंबई-३२.
दिनांक : २ मे २०१८.

प्रति,

कुलसचिव,
महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ,
फुटाळा तलाव मार्ग, नागपूर-१

**विषय :-** National Fellowship and Scholarship for Higher Education of Scheduled Tribe Students या योजनेची प्रसिध्दी करण्याबाबत..

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी सचिव (पदुम) यांना उद्देशून लिहीलेल्या दिनांक २१ एप्रिल, २०१८ चे अ.शा. पत्र व सहपत्राची प्रत सोबत जोडली आहे.

२. सदर योजनाबाबत विद्यापीठांतर्गत असलेल्या महाविद्यालयांना विविध माध्यमांव्दारे (जाहिरात, पत्रके, नोटीस, संकेतस्थळ, इत्यादी) व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल आदिवासी विकास विभाग व या विभागास सादर करावी, ही विनंती

आपला,

(विकास तु. कदम)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

सोबत : वरील प्रमाणे

आवक क्रमांक 1054
दिनांक 5/5/18
महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापिठ, नागपुर.

महाराष्ट्र शासन

सचिव (पदुम) यांचे कार्यालय
23 APR 2018
टपाल क्रमांक E-3044726

**आदिवासी विकास विभाग**
**मंत्रालय, मुंबई**

**मनिषा वर्मा**
(भा.प्र.से.)
प्रधान सचिव

दिनांक : २१ एप्रिल, २०१८.

**विषय :-** National Fellowship and Scholarship for Higher Education of Scheduled Tribe Students या योजने संदर्भात दि.२५.०४.२०१८ video Conference.

श्री. कुरूंदकर जी

विषयांकित प्रकरणी उप सचिव, जनजाती कार्य मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या सोबत जोडलेल्या दि.१९.०४.२०१८ व दि.२०.०४.२०१८ रोजीच्या पत्रांचे व सहपत्राचे कृपया अवलोकन व्हावे.

सदर पत्रान्वये National Fellowship and Scholarship for Higher Education of Scheduled Tribe Students या योजनेसंदर्भात दि.२५.०४.२०१८ रोजी video conference आयोजित केली असल्याचे तसेच सदर योजनेची विविध माध्यमांद्वारे प्रसिद्धी करण्याबाबत कळविले आहे.

National Fellowship and Scholarship for Higher Education of Scheduled Tribe Students या योजनेचे Fellowship आणि Scholarship असे दोन घटक असून याअंतर्गत केंद्र शासनाकडून देशभरातून निश्चित केलेल्या निवडक शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षण घेत असलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाकरिता आर्थिक सहाय्य देण्यात येते. योजनेंतर्गत शिष्यवृत्ती या घटकांतर्गत महाराष्ट्रातील सुमारे १० शैक्षणिक संस्थांमधील एकूण ९२ अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना तसेच फेलोशिप या घटकांतर्गत सुमारे ४० शैक्षणिक संस्थांमधील एकूण ९९ अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना लाभ देण्यात आलेला आहे. तथापि, अद्यापही काही शैक्षणिक संस्थामध्ये शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांचे प्रस्ताव प्राप्त झाले नसल्याचे केंद्र शासनाच्या पत्रामध्ये नमूद केलेले आहे. सबब, या योजनेबाबत संबंधित शैक्षणिक संस्था किंवा त्यामध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना माहिती नसण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सबब, आपल्या अंतर्गत असलेली विद्यापीठे व त्यांच्या कार्यक्षेत्रातील महाविद्यालये/शैक्षणिक संस्था यांना सदर योजनेची विविध माध्यमांद्वारे (जाहिरात, पत्रके, नोटीस इत्यादी) व्यापक प्रसिद्धी करण्याच्या सूचना दिल्यास मी आपली आभारी राहीन.

शुभेच्छा सह आपली स्नेहांकिता,

(मनिषा वर्मा)

प्रति,

श्री.के.व्ही.कुरूंदकर
सचिव
पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, मत्स्यसंवर्धन विभाग,
मंत्रालय, मुंबई.

C:\Users\rajesh.giri1\Desktop\NATIONAL FELLOWSHIP & SCHOLARSHIP\ई समिक्षा.docx